I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 :259-261
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCES
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोरोना -१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला प्रभाव

प्रा. डॉ. प्रकाश मारोतराव वांढरे

सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग प्रमुख
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.

ब्व्उउनदपबंजमक रू२०ण्०२ण्२०२२ | त्मअपेपवद रू १५ण्०३ण्२०२२ बिबमचजमक रू२५ण्०३ण्२०२२ | च्नइसपीमकरू ०१ण्०४ण्२०२२

**सारांश :**
भारताच्या अर्थव्यवस्था ही कोरोना येण्यापुर्वी नोटबंदी व जीएसटी अशा प्रकारच्या उपाययोजंना केल्यामुळे आर्थिक अडचणीत असतांना कारोना ही जागतिक माहामारी आल्यामुळे आपला देश हा आर्थिक अडचणीत सापडला आहे.आपल्या अर्थव्यवस्थेची गती नोटबंदी व जीएसटी मुळे अडथळे निर्माण झालेत.त्यानंतर परत लॉकडाउन मुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे आठ ते नऊ लाख करोड रूपये नुकसान झाले असा अदांज आहे.लॉकडाउन मुळे रस्ते वाहतूक ,विमान वाहतूक,रेल्वे वाहतूक,जल वाहतूक सपुर्णता ठप्प झाली आहे.त्यांचा परीणाम म्हणजे पर्यटन व्यवसाय ,दागदागीने व्यवसाय,वस्तूव सेवाची निर्मीती करणारे उद्योग या सर्वावर वाईट असा प्रभाव पडला आहे.
प्रामुख्याने शेती व्यवसायावर सुध्दा कोरोनाचा प्रभाव पडला आहे.लॉकडाउन मध्ये शेती मध्ये उत्पादीत होणारा माल ,भाजीपाला, फळे दुध व नाशीवंत वस्तू ह्या बाजारपेठेपर्यन्त पाहचू शकल्या नाहीत.हा सर्व माल हा जाग्यावरच नाश पावला आहे.
कोरोनाच्या माहमारीमुळे काही अनूकूल स्वरूपाच फायदे सुध्दा पाहावयास मिळाले आहे .या मध्ये उदा. ई व्यापारात वाढ,साबन सॅनीटायझर औषधी मास्क इ. ची वाढलेली मागणी या मध्ये पर्यावरणचा फायदा झाला आहे देशातील प्रदूषणामध्ये मोठया प्रमाणात घट झाली आहे.भारतीय अर्थव्यवस्थेची आत्मनिर्भतेकडे वाटचाल हे फायदे कोरोनाच्या माहमारीमुळे झाले असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेचे झालेले नुकसान कधीही भरून न निघणारे आहे.
कोरोनाच्या माहमारीपासून लोकांना वाचविण्या साठी सरकारला अनुत्पादक कार्यावर मोठया प्रमाणावर खर्च करावा लागला आहे. कोरोनाच्या माहमारीमुळे सुमारे दोन वर्षाचया कालावधीत अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रा मध्यून बेरोजगाराचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. उद्योगासाठी लागणाऱ्या कच्चा मालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याची मालाची मागणी सुध्दा कमी झाली आहे.त्यामुळे सामान्य जनतेचे उत्पन्न कमी झाले आहे .वस्तूच्या मागणीवर सुध्दा मोठया प्रमाणावर कमी आलेली आहे.या मुळे अर्थव्यवस्था एक प्रकारे दृष्ट चकात सापडलेली आहे.त्याचा परीणाम म्हणून आर्थिक विकास दर कमी झाला आहे.आशिया विकास बॅकेच्या मते २०२१-२२ मध्ये भरतीय विकास दर ५.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे

**बीजशब्द :** आर्थिक विकास बेरोजगारी,उत्पन्न,व्यवसाय ,शेती व उद्योग

**प्रस्तावना:**
कोरोना १९ या मुळे संपूर्ण जगात थैमान घातले आहे. कोरोना हा विषाणू सर्व प्रथम चिन मधिल वुहान या प्रान्तांत आढळून आला.चिन मध्ये या विषाणू मुळे ४५०० नागरीकाचा मृत्यू झाले आहेत.आशियाई देशानंतर कोरोणाचा सर्वाधिक विस्तार हा युरोप,अमेरिका खंड,आफिका खंडा सहमध्यपुर्व रशिया,या देशा मध्ये झाला आहे. अमेरिका ,ईटली फ्रान्स,इंग्लंड या विकसीत देश मध्ये मोठया प्रमाणावर कोरोणामुळे अधिक बळी गेल्याचे दिसून येत आहे. कोरोना या माहमारी मुळे सपूर्ण पृथ्वी वरील मानव जात संकटात आली आहे.त्याचा फटका सर्व क्षेत्रांना कमी जास्त प्रमाणात बसला आहे.उद्योग व्यापार,रोजगार,कृषी,पर्यावरण,शिक्षण,

*आरोग्य,वाहतूक, पर्यटन इ.क्षेत्रावर गंभीर परिणाम झाले आहे.त्याच प्रमाणे देशातील जन सामान्याचे उत्पन्ना वर सुध्दा परीणम झाला आहे.देशव्यापी लॉकडाउन मुळे अनेकांना माणसीदृष्टया त्रास सहन करावा लागला आहे.आपल्या देशात २०१९ते२०२० मध्ये कोरोनाची सुरवात झाली.त्यानंतर तीन महीण्यानंतर पुन्हा दुसरी लाट मोठ्या प्रमाणावर आपल्या देशात बळी घेतले २०२१ ते २०२२ मध्ये तिसरी लाट आलेली आहे.या सर्व कारणामुळे देशाचे अर्थचक्र थाबलेले आहे.*

***उद्देश :***

*१)कोरोना १९ चा भारतीय अर्थव्यवस्थे वर झालेला परिणामांचा अभ्यास करणे*

*२) कोरोना १९ च्या विषाणूमुळे मानवी जिवनात झालेल्या बदलाचा आढावा घेणे*

*3) कोरोना १९ मुळे शेती क्षेत्रा समोरील संकटाचा अभ्यास करणे*

***संशोधन पध्दती :***

*प्रस्तूत संशोधन लेखामध्ये प्राथमिक व व्दितीय स्वरूपाची माहिती घेतली आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती मध्ये प्रामुख्याने प्रत्यक्ष निरीक्षण बातम्या व दैनिक वर्तमानपत्रे उपलब्ध साहित्याचा वापर करण्यात आला आहे.तर व्दितीय स्वरूपाची माहिती विविध विभागाच्या संकेत स्थळावरून अदयावत माहिती संकलीत करण्यात आली आहे. प्रस्तूत शोधनिबधासाठी वर्णणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला असून या मध्ये संदर्भ ग्रथ मासीके वर्तमानपत्रे इ. माहितीचा आधार घेतला आहे.*

***कोरोना १९ चा भारतीय अर्थव्यवस्थे वर झालेला परिणाम :***

*कोरोणा विषाणू संसर्गामुळे सपूर्ण जगावर लॉकडाउन करण्याची वेळ आली.या कोरोना विषाणू मुळे सपुर्ण जगात व भारतात च्या आर्थिक चक्रवर काय परिणाम झाले व अजूनही होत आहे.या विषयी माहीती घेण्यात आली. भारतात प्रथमता मार्च २०२० मध्ये लॉकडाउन ची सुरवात झाली.यासाठी सपूर्ण बाजारपेठा बंद करण्यात आल्यात. त्यानंतर विविध कार्यालये व वाहातूक व्यवस्था बंद करण्यात आल्यात.याचा सपूर्ण परिणाम आपल्या देशातील अर्थव्यवस्थेवर तिव्र गतीने होत चालला आहे.लॉकडाउन लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली.याचा परिणाम लोकांच्या स्थांनातरावर झाला आहे.याचा परिणाम उद्योग व्यवसाय कारखानदारी इ.उत्पादन क्षेत्रावर प्रचंड प्रमाणात फटका बसला आहे.आर्थीक चक्र थाबल्यामुळे लोकांना नोकरी व मजूरी गमवावी लागली.याचा परिणाम सपूर्ण देश महागाईच्या विळख्यात अडकला गेला.कोरोणा १९ च्या लाकडाउन मुळे निर्माण झालेल्या परिस्थीती मुळे मागणी आणि पुरवठा मध्ये लक्षणिय घट झाली.*

***कृषी क्षेत्रावरील परिणामः-*** *कोरोणा विषाणूचा भारतीय कृषी क्षेत्रावर परिणाम झालेला आहे.लॉकडाउन मुळे देशातील शेतकरी व शेती उद्योग,शेतमजूर या मुळे मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे.हा शेतकरी वर्षभर शेतामध्ये कष्ट करून पिकवलेला माल बाजारात विकण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्यात त्या पुर्वी अतिपाउस ह्यामुळे मका कापूस तूर सोयाबीन या वर आलेली रोगराई त्या मुळे घटलेल उत्पादन आणि पडलेले बाजारभाव यामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना पाहीजे त्याप्रमाणात नफा मिळाला नाही. त्याचबरोबर विदर्भातील फळ म्हणजे संत्रा मोसबी याचे सूध्दा शेतकयाना फार मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले शेतकऱ्यांना शेतातील माल काढण्यासाठी मजूराचा तुटवडा माल विकण्यासाठी प्रवास बंदी व अवेळी येणारा पाउस यामुळे शेतकरी*

वर्गाचे फार मोठ्या प्रमाणावर नूकसान सहन करावे लागले. शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग ,कारखाने यांना माल आयात करणे व पक्का मालाची विक्री करणे यात ब-याच अडचणी निर्माण झाल्यात व पर्यायाने नुकसान सहन करावे लागले.

१)अन्न प्रक्रिया उद्योग :-सपूर्ण देशात कच्चा माल शेती व्यवसायातून प्राप्त होतो.या शेती मालाचे पक्का मालात रूपांन्तर करण्याचे कार्य हे उद्योगाचे आहे.कोरोणा काळात अन्नप्रक्रिया उद्योग सुरू आहेत परंतू उद्योगात काम करणारे कुशल व अकुशल कामगार हे आतंर राज्य व आतंर जिल्हा प्रवास बंदी मुळे हे काम करण्यासाठी येउ शकत नव्हते, याचा परीणम कच्चा मालाच्या पुरवठ्यावर सुध्दा झाला. कारखानदारानी कमी मानवी श्रमात जास्त काम करून मागणी पुर्ण करण्याची गरज आहे जर असे केले नाही तर त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारपेठेवर झाल्या शिवाय राहणार नाही.

२).फळे,भाजीपाला,व नाशवंत वस्तू वर सर्वाधिक प्रभावः-

कोरोनाच्या सकंटा मुळे बागायती शेती सर्वात प्रभावित झाली आहे.या मध्ये कषी उत्पादनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुरवातीला देश बंदी ,राज्य बंदी ,जिल्हा बंदी तालुका बंदी यामुळे माल वाहतूकीत अडथळे निर्माण झाले.व शहरामध्ये कृषी माल पाठविणे अवघड झाले त्यामुळे भाजीपाला व फळे नाशवंत वस्तू ह्याचे ६० ते ७० टक्के नुकसान झाले आहे. द्राक्ष आंबा कलिगंड सत्री मोसबी टरबूज खरबूज मासोळी या प्रमूख पिकांना सर्वाधिक फटका बसला आहे. कांदा पिकाचे व इतर भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.५0ते ६०रू कि.लो भावाने विकणरा कांदा २० ते 30 रू किलो दराने विकावा लागला त्याच प्रमाने टरबूज ४०रू किलो दराने विकणरे १०रू प्रती कि.प्रमाने विकावे लागल.त्यामुळे शेतक-याने लागवड करण्याकरीता केलेला खर्च सुध्दा निघू शकला नाही.त्यामुळे कर्जाचा डोंगर शेतक-यासमोर उभा राहीला अशा परिस्थितीत शेतक-याचे नुकसान कधीही भरून निघू शकत नाही.

3)उद्योग धदे बंद :-भारतात चिन मधून कच्चामालाची आयात करण्यात येते तेथील कारखाने बंद केल्यामुळे कच्चामालाच्या किमती मध्ये प्रचंड वाढझाली आहे.सोने मास्क सॅनिटायझर स्मार्ट फोन औषधी व इतर वस्तू कोरोणा साथी मध्ये अनेक उद्योग बंद पडले.याचा सर्व परिणाम उत्पादन निर्मीती पासून रिअल इस्टेट पर्यत व हॉस्पीटल पासून हॉटेल व्यवसायवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला.

४)भारतीय रेल्वे सेवा बंद झाली.:-सपूर्ण जगात सर्वात मोठी अशी रेल्वे कोराना साथी मुळे बंद पडली.ही सेवा मार्च २०२० पासून बंद पडली यामुळे या रेल्वे बोर्डाला कोटयावधी रूपयांचा तोटा सहन करावा लागला

५)रोजगारावर परिणामः-देशात निर्माण झालेल्या कोरोणा साथीचा परिणाम उद्योग क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर झाला त्याचा परिणाम मानवी श्रम रोजगारावर सुध्दा झाला. त्यामुळे मोठे कारखाने शेकडो प्रमाणात लघूउद्योगधंदे बंद पडले.त्यामुळे सपूर्ण रोजगार क्षेत्रावर बरोजगाराची संकट निर्माण झाले.अनेक कंपन्यानी मजूरांना कामावरून कमी केले.मार्च ते ऑगष्ट पर्यत सुमारे २२ दसलक्ष पगाराच्या नोकदाराच्या नोक-या गेल्यात.

६)पर्यटन क्षेत्रावर परिणाम :-सपूर्ण देशात या साथीच्या रोगाचा वाईट परिणाम पर्यटन क्षेत्रावर झाला.ही साथ जागतीक असल्यामुळे व मानवी संर्पकामुळे वेगाने जगभर पसरल्या गेली आहे.या मुळे दळणवळणया वर

मर्यादा आल्या आहेत.त्या मुळे हॉटेल व्यवसाय व पर्यटन क्षेत्रावर त्याचे गंभीर परिणाम झाले.याचा फटका भाताच्या अर्थव्यवस्थेमध्ये बसला आहे.या पर्यटन क्षेत्राचे योगदान २.४टक्के इतके आहे. मुळे कोवीड साथीमुळे पर्यटन सपूर्ण बंद झाले आहे.

७)महागाईत वाढः-आरबीआय च्या अहवाला नुसार कोरोण विषाणूचा परिणाम थेट महागाईवर होणार आहे. पुरवठ्याच्या अडचणी मुळे अन्नपदार्थाच्या किमती मध्ये घसरण झाली आणि बिगरखादय पदार्थाच्या किंमती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोण विषाणूच्या साथी मुळे इतर देशातील अर्थशास्त्रज्ञांनी जगभरातील निर्यात बंदीचा इशारा दिला होता.

८)तेल आणि गॅस इंधनाच्या मागणीत घट :-भारत हा देश अरब राष्टाकडून तेल व वायू यांची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते यु एस ए व चिन नतंर भारत हा प्रमूख आयात करणारा देश आहे.वाहतूक व औद्योगिक उत्पादन घटल्याने वस्तू व दळणवळण मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने सपुर्ण देश लॉकडाउन असल्याने परिवहन इंधनाची तेल व वायू मागणी कमी झाली.त्याचा परिणम म्हणून या काळात कच्चातेलाच्या किमती मध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली.यावर उपाय म्हणून सरकारने उत्पादन शुल्क वाढवून तसेच रस्ते सेस मध्ये वाढ केली.यामुळे इंधन दरवाढीने जनसामान्याचे अतोनात हाल झालेत.

९)कोविड साथीचा सर्वात जास्त फटका शेअर्स मार्केट वर परिणाम झाला.या मुळे गुतंवणूक दाराचे हजारो कोटी रूपये बुडाले जागतिक शेअर्स बाजाराबरोबर भारताच्या शेअर्स बाजारावर परिणाम झाला २ फेब्रवारी २०२०पर्यत जागतिक शेअर्स बाजारात२००८ च्या आर्थिक संकटानंतरची सर्वात मोठी घसरण दिसून आली.१०,११,व१२ 2020 मध्ये जागतिक बाजार कश झाला.भारताच्या शेअर्स बाजाराने १२ मार्च २०२० ला निच्चांक गाठला.अश तऱ्हेने गुतंवणूक दाराचे हजारो कोटी रूपये बुडाले.

१०)जीडीपी त मोठ्या प्रमाणात घसरणः- भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा शेतीच्या उत्पादनावर अवलंबून आहे कोरोना विषाणूच्या देशातील लॉकडाउन मुळे जीडीपी त मोठ्या प्रमाणात घसरण झाली पण भारतीय अर्थव्यवस्थेला सावरण्याचे काम शेती क्षेत्राने केले. जीडीपी त मोठ्या प्रमाणात घसरण असलेला जीडीपी ३.४ टक्के वाढझालेली बुडत्या जीडीपी ला शेती क्षत्रातून आधार मिळाला आहे.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेत कोविड १९ च्या संकटामुळे सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला आहे.परंतू याचा सर्वात जास्त परिणाम हा रोजगारीवर झाला आहे.मार्च २०२० पासून जवळ पास 11.30 कोटी मजुराना रोजगार गमवावे लागले आहे.त्यामुळे दारिद्रयाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढझालेली आहे. २०२० -२१ मध्ये पहील्या तिमाही मध्ये बेरोजगारीचा दर १८.९ टक्के एवढा होता ही स्थिती अर्थव्यवस्थेसाठी फार मोठी धोक्याची घंटा दिसून येते.यासर्व परिणामावर लवकर उपाययोजना करणे देखील तितकेच महत्वाच आहे.कोरोनाच्या महासाथीला भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा प्रतिसाद देत भारत सरकारने आत्मनिर्भर कार्यक्रम जाहीर केला या योजनेत भारत स्वतः पुरते नाही तर सर्व जगासाठी उत्पादनचे ध्येय ठेवील असे सांगितले जात आहे. बाहेर देशाला तेव्हाच उत्पादन निर्यात करू शकतो जेव्हा देश आयातीसाठी दरवाजे सतत उघडे ठेवायला तयार असतो देशात उत्पादन वाढले आपोआपच रोजगाराच्या संधी निर्माण

*होत असतात अशा तऱ्हेने आपली अर्थव्यवस्थेला उभारी देणे शक्य होईल.*

***संदर्भ :***

*लोकसत्ता वर्ष वेध २०२०*
*अर्थसंकल्प २०२१*
*विकीपिडीया*
*वृतपत्रे*
*योजना मासीक मे २०२०*